
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 1 | OCTOBER - 2019

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे राष्ट्रप्रेम

**प्रा. डॉ. सुधीर भगत**
सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग प्रमुख)
भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय, एटापल्ली जि. गडचिरोली.



महाराष्ट्रात संताची, फार मोठी परंपरा आहे या संतानी सुधारकांनी भारतीय संस्कृतीला वैभव प्राप्त करुन दिले आहे. एक आगळे वेगळे रुप व स्थान प्राप्त करुन दिले. १९ व्या शतकात जन्माला आलेले अलौकिक व्यक्तीमहत्वाचे एक संत व समाज सुधारक म्हणजे संत तुकडोजी महाराज हे होत.

संत तुकडोजी महाराजांचा जन्म अमरावती जिल्हयातील यावली या खेडयात एका गरीब, सश्रध्द आणि भाविक कुटुंबात १० एप्रिल १९०९ साली झाला. त्यांचे वडील बंडोजी आणि आई मंजुळाबाई हे दोघेही भक्त होते त्यांच्या घरात विठ्ठलाची आणि माहुरगडाची वारी होती. शिवाय त्यांचे मामा ही सत्पुरुष अडकोजी यांच्या सेवेत होते त्यामुळे मानके बडोजी ठाकुर यांना अध्यात्माचा छंद लागलेला होता. एकांत ठिकाणी बसणे, विचार चक्रात रमुन जाणे आध्यात्मिक वारसा लाभलेला होता तुकडोजी महाराजांना बालपणापासुनच भजने म्हणणे याची आवड होती. भजनात तुका म्हणे असे म्हणत तेव्हा त्यांना शिक्षकांनी त्यांना घ्तुका नाहीस तर तुकडया तर आहेसङ असे म्हटले ही गोष्ट त्यांच्या मनाला लागली आणि मग ते रचना करु लागले त्यांचे शिक्षण मराठी ३ री पर्यंत झाले होते. त्यांनी विपुल लेखन केले त्यांनी अभंगासाठी तुकडया म्हणे ही नाममुद्रा स्विकारली पुढे ते माणिक ठाकुर ऐवजी लक्षवेधी समाजसुन्मुख सुधारणावादी, धर्मभेद यासारख्या समाज विघातक गोष्टीवर हल्ले चढवुन त्यांनी देशभक्ती, अहिंसा व आत्मसयंम याचे पाठ दिले. त्यांचा व्यक्तिमहत्वात निर्भयता, नम्रता, उदंड आत्मविश्वास, जनकल्यानाची तळमळ, करुणा,जाज्वत्य, देशप्रेम, राष्ट्रभक्ती, सडेतोडपणा, मानवतावाद, इत्यादी गुणांचा वास होता. त्यांच्या व्यक्तिमहत्वात कवित्व आणि साधुत्व यांचा मिलाफ झाला होता. त्याचबरोबर त्यांनी सामाजिक सुधारणा, आध्यात्मिक तत्वज्ञान, सर्वधर्मसमन्वय साधण्याचा प्रयत्न केला. राष्ट्राचे तेज,ओज, राष्ट्राची एकात्मता, राष्ट्राचे चारित्र्य संपन्नता अभंग राखण्यासाठी ज्यांनी आपली वाणी, लेखनी, भजन कला आणि करणी अहर्निस, उदयोगतिस नेली असे निष्काम प्रेमयोगी संत होते. त्यामुळे त्यांना सामान्य जनतेच्या आत्मोध्दाराचा, सामाजिक विकासाचा मार्ग दाखविणारे संत म्हणुन व सामाजाचा पर्यायाने राष्ट्राची जडणघडण करणारे संत होते म्हणुन त्यांना जनतेचे राष्ट्रसंत अशी पदवी बहाल केली होती.

त्यांनी विविध भाषांमध्ये व विविध वाड्मय प्रकारात लेखन केले. त्यांनी मराठी व हिंदी भाषेत साहित्यनिर्मिती केली. त्यांनी मराठीत ३० व हिंदीत ही जवळपास २८ ग्रंथ लिहिले त्यात ओवीबध्द लेखन, भजनावली, लेख, पोवाडे, अभंगावली, प्रवचने, भाषणे वचणे, श्लोक छंद, गझल, गीते, अशा विविध प्रकारात लेखन केले, त्यांचे मराठीतील प्रमुख साहित्य संपदा पुढील प्रमाणे नोंदविता येईल.

ग्रामगीता, अनुभव सागर, भजनावली, भाग-१.२ जीवन जागृती भजनावली, लोकशाहीचे पोवाडे, समाज संजीवनी (भजनावली), दिव्यदर्शन भजनावली, क्रातीवीणा भजनावली, नवजागृती भजनावली, विवेक माधुरी, राष्ट्रीय भजनावली, अरणोदय भजनावली, भक्तिकुंज भजनावली, आदेश रचना, अनुभवामृत अभंगावली भाग-१.२ आत्मविश्वास अभंगावली, माझी आत्मकथा अभंगावली, स्फुर्तितरंग, सुविचार स्मरणी, आनंदामृत, श्री. गुरुदेव विवाहपध्दती, विश्वशांती, योग (लेखसंग्रह), गीता प्रसाद (लेखसंग्रह), युगप्रभात (लेखसंग्रह), राष्ट्रसंतांची भजनावली असे जवळपास ३० ग्रंथ लिहिले. हिंदी भाषेत ही त्यांनी विपुल लेखन केले आहे.

संत तुकडोजी महाराजांचे समाज निरीक्षण बारकाईचे व सुक्ष्म होते. त्यांनी देशस्थितीचे, समाजस्थितीचे निरीक्षण केले. त्यात त्यांना समाजात असलेल्या जात, धर्म, पंथ, क्षेत्र इत्यादी बरोबर समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्रय, अनिष्ट रूढी, स्पृश्य-

अस्पृश्यता विविध पंथापंथातील भेदाभेद महिलांची कुचंबणा, जगण्यातील विसंगती, विकृती,दांभिकता यांचे दर्शन झाले. समाजातील उपेक्षित, अपंग, पोरके पिडीत, शोषित, दलित, पतित, हिनदीनांचे दुःख जाणवले तसेच आळसी, मरगळलेला, व्यसनाधीन समाज, गावागावात दारुड्यांचा धुमाकुळ, जुगार, चौरी, एकमेकांमधील भांडण, मुलाबाळांची, स्त्रीयांची असुरक्षितता पाहुन त्यांचे मन खिन्न व विषण्ण बनले. आणि त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येयच बदलविले. आध्यात्माचा अर्थ, समाजविकासाचा, परिवर्तनाचा अर्थ, समाजोध्दाराची संकल्पना बदलविली. दारिद्रयांनी उपासमारीने हैराण झालेल्या सामान्य जनतेचा उध्दार करणे, मरगळलेल्या समाजमनात चैतन्य निर्माण करणे, स्पृश्यास्पृश्य भाव नष्ट करणे व समाजातील सोंगढोंग, अनिष्ट रूढी परंपरा विसंगती, अंधश्रध्दा नष्ट करुण महिलोन्नती साधणे, जुन्यानव्या जीवनमुल्यांची सांगड घालणे, श्रमप्रतिष्ठा वाढविणे, शिक्षणप्रसार करणे आणि ग्रामोध्दार करणे हेच जीवित ध्येय बनले.

त्यांनी आपल्या साहित्यात अभंगामध्ये म्हटले आहे की, मी जे साहित्य शिकलो ते पुस्तकातुन नव्हे तर मी शिकलो अफाट जनसागरातुन हदयाच्या गाभाऱ्यातुन आंतरीक उंचबळीतुन त्यांनी जे समाजाचे निरीक्षण केले त्यातुन त्यांना ही प्रेरणा मिळाली आहे. बुडते हे जन न देखवे डोळा अशा परिस्थितीतुन त्यांना साहित्य लेखनाची प्रेरणा मिळाली आहे. म्हणुन त्यांनी या परिस्थितीचे व जनसामान्यांच्या व्यथावेदनांचे चित्र शब्दातुन मांडले आहे. त्यांचे साहित्य हे जीवनातुन प्रेरणा निर्माण झाली आहे.

समाजातील भीषण वास्तवाने त्यांच्या संवेदनशील मनाला अस्वस्थ केले. हे कोठे तरी बदलले पाहिजे. सामान्य माणसाच्या जीवनीतील विसंगती, विकृती, शोषण, दुःख नष्ट झाले पाहिजे. अध्यात्माचे आणि समाजाचे वैचारिक शुध्दीकरण व्हायला हवे याचा त्यांनी ध्यास घेतला आणि आपल्या साहित्यातुन समाजातील सर्व घटकांचा विचार मांडला ह्या त्यांच्या साहित्याच्या प्रेरणा आहेत. ते म्हणतात मानवीजीवन उत्कर्षित व्हावे यासाठीच काव्यरचना केली. चित्त लावावे साधनी ! मन गुंतवावे लेखणी ! देह पाडावा भजनी ! सेवा करावी जीवांनी ! म्हणोनि उपक्रम केला ! तुज गाईले विठ्ठल ! तुकडया म्हणे नाही आस ! उपदेशास कोणास ! यावरुन त्यांच्या साहित्याच्या प्रेरणा लक्षात येतात.

संत तुकडोजी महाराजांच्या साहित्यात अनेक विविध विषय आलेले आहेत. त्यांत त्यांचे धर्मचिंतन, नीती, अनीती, चालीरीती, विवेक, प्रपंच- अध्यात्म, ग्रामव्यवस्था, देशस्थिती, राष्ट्रप्रेम, महिला उध्दार अशा किती तरी विषयावर तुकडोजींनी विचार मांडला आणि पुरोगामी, मानवतावादी, लोकशाही, तत्वे वगैरे विषयांना स्पर्श केलेला आहे. सर्व क्षेत्रातील वाईट अंश काढुन चांगल्या गोष्टीचा आग्रह धरला. त्यांनी सुंदर व आदर्श ग्रामजीवनाचे तसेच स्वतंत्र भारताचे स्वप्नचित्र रेखाटले आहे.

संत तुकडोजी महाराजांच्या साहित्यांत सर्वात महत्वाचा ग्रंथ म्हणजे ग्रामगीता होय. या ग्रंथा संदर्भात ते म्हणतात ध्वाचता वाट दाखवी जनांसी ! आणि आजच्या युगाची संजीवनीङङआहे. थोडक्यात हा ग्रंथ दिपस्तभाप्रमाणे समाजास मार्गदर्शन करणारा ग्रंथ आहे.

ग्रामगीता ह्या ग्रंथात एकुण ४१ अध्याय असुन या ग्रंथाची ओवी संख्या ४६७५ एवढी आहे या ग्रंथाचे आठ विभाग असुन प्रत्येक विभागात ५ अध्याय आहेत. आणि ग्रंथाच्या शेवटी एक अध्याय (प्रकरण) आहे ही आठ प्रकरणे पुढील प्रमाणे आहेत.

१. सध्दर्ममंथन, २ लोकवशीकरण, ३ ग्रामनिर्माण, ४ दृष्टिपरिवर्तन, ५ संस्कारशोधन, ६ प्रेमधर्मस्थापन, ७ देवत्व शोधन, ८ आदर्श जीवन असुन शेवटी ग्रंथ महिमा प्रकरण आहे.

या आठ विभागात आलेल्या विषयांचे स्थुल स्वरुप पुढीलप्रमाणे मांडता येते.

**सध्दर्म पंचक -** यात देवदर्शन, धर्माध्यायन, आश्रमधर्म, संसारपरमार्थ आणि वर्णव्यवस्था.

**लोकवशीकरण पंचक -** संसर्ग, प्रभाव, आचार प्राबल्य, प्रचार महिमा, सेवा साधर्म्य आणि संघटन.

**ग्रामनिर्माण पंचक** - मध्ये ग्रामरक्षक, ग्रामशुध्दी, ग्रामनिर्माण कला, ग्राम आरोग्य आणि गोवंश सुधारणा.

**दृष्टिपरिवर्तन पंचक** - वेश वैभव, गरीबी, श्रीमंती, श्रम-संपत्ती, जीवनरक्षण आणि महिलोन्नती.

**संस्कार शोधन पंचक** - वैवाहिक जीवन, अंत्यसंस्कार, संणोत्सव, यात्रा, मेळे, आणि देव- देवळे.

**प्रेमधर्मस्थापक पंचक** - मूर्ती उपासना, सामुदायिक प्रार्थना, प्रार्थना आणि विश्वधर्म, दलित सेवा आणि भजन प्रभाव इत्यादी.

**देवत्व साधन पंचक** - संतचमत्कार, संत स्वरुप, अवतारकार्य, प्रारब्धवाद आणि प्रयत्न प्रभाव.

**आदर्श जीवन पंचक** - जीवनकला, आत्मानुभव, ग्राम, कुटुंब, भुवैकुंठ आणि ग्रंथाध्यायन.

**ग्रंथ महिमा** - असे विविध विषयानुषगाने विचार मांडले आहे.

या शिवाय संत तुकडोजी महाराजांनी भजने, अभंग, ओव्या, श्लोक, पोवाडे, आरत्या, कंगलाष्टके, श्री.गुरुमहिमा अशी साहित्य संपदा नोंदविता येतात. या संदर्भात साहित्याची वैशिष्टये नोंदवितांना म्हणतात की, घ्संत तुकडोजी महाराजांच्या या साहित्यात प्रासादिकता, लोक कल्यानाची तळमळ, स्पष्टवक्तेपणा, आणि वक्तृत्वातील आवाहकता जाणवते.

त्यांच्या विचारात आणि आचारात एकरुपत्व होते. ते समाजोध्दारासाठी कटीबध्द होते. त्यांनी समाजाच्या सुदृढ आरोग्याच्या दृष्टिने, समाजविकासाच्या दृष्टिने, अतिशय मोलाचे विचार मांडले आहेत. त्याच बरोबर व्यक्तिविकास व आध्यामित्क उन्नतीच्या दृष्टिनेही त्यांचे मोलाचे विचार महत्वाचे आहेत. काळ बदलला तरी ते विचार आजही उपयुक्त ठरतात. त्यामुळे या विचाराचे मोल कमी होत नाही. त्यांनी देव, धर्म, मूर्तीपुजा, प्रपंच-परमार्थ, आदर्श गृहस्थाश्रम, स्पृश्य- अस्पृश्यता, समाजविघातक, अनिष्टरूढी, प्रथा, चालीरीती यावर अडकुन टिका केली. या शिवाय समता, बंधुभाव, महिलोन्नती, कृषी उत्कर्ष, राष्ट्रभक्त, इ. चे दर्शन घडते. डॉ. राम घोड म्हणतात, प्रपंच -

परमार्थ व्यवहार आणि तत्वज्ञान, जनवास आणि वनवास, आचार आणि विचार, भावना व बुध्दी, ज्ञान व विज्ञान प्रवृत्ती व यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे.

**देव परमात्मा-** संत तुकडोजी महाराजांनी परमात्म्यासंदर्भात अतिशय निःसंदिग्धपणे विचार मांडले आहेत. या विश्वात ईश्वर एकच आहे. परंतु त्याची अनेक रुपे जाणवतात ग्रामगीतेत म्हणतात घ्ओम नमोजी विश्वचालका ! भासशी विश्वरूपी ! आपचि झाला धराधर ! उरला भरोनि महीवर ! अणुरेणुंतनि करिशी संचार ! विश्वनाटक नटावया ! असा परपेश्वर देवदेवळात नाही. गिरीकंदरात नरही तर तो सर्व चरांचरात व्यापुन राहिलेला आहे. तो सर्वानुभूती सर्वाठायी आहे. म्हणुन ते म्हणतात. घ्जन तितुका जनार्दन ! जाणुनि कार्य करावे ! लोकांमधेच ईश्वर पहावा आणि घ्जनसेवा हिच ईश्वर सेवा डअसे मानतात. म्हणुनच मंदर मंदर त्या घुंमता है ! पहले सेवा कर गरिबोंकी ! अशा प्रकारे दीन दु:खितांच्या देहात देव शोधुन त्यांची निरपेक्ष सेवा हिच खरी देव भक्ती होय असे सांगतात. घ्देव म्हणजे घेवचि नव्हे ! सर्व काही देवचि आहे ! किंवा घ्जनता ज्याला देवरुप कळली ! त्याचीच भक्ती देवा पावली ! असे सांगुन जन सेवा हीच ईश्वर सेवा असे विचार मांडले.

**मूर्तीपुजा -** संत तुकडोजी महाराजांनी चराचरांत व्यापलेला निर्गुण निराकार परमेश्वराचे रुप मानतात. या निर्गुण निराकार परमेश्वरापर्यंत पोहचण्यासाठी मूर्तीपुजेची आवश्यकता वाटते. म्हणुनच मूर्ती पुजेला त्यांनी मान्यता दिली आहे. ते म्हणतात. घ्मनास पाहिजे काही आधार ! म्हणोनि आरंभी मनिले साकार ! देव व्यापीले चराचर ! तेथे मूर्ती तद्रुपचि ! आणि पुढे म्हणतात, घ्प्रेम निर्मावे एका मूर्तीवर ! तेचि क्रमाने करावे विश्वाकार ! हाच हेतु पुजनाचा ! असा मूर्तीपुजेसंदर्भात विचार मांडतात.

**धर्मचिंतन -** संत तुकडोजी महाराजांनी पारंपारिक कर्मकांडाधरित धर्माचे रुप नाकारले आहे. केवळ पुजा अर्चा, व्रतवैकल्य करावयास लावणारा, पोथी पुराणाचे वाचन करणारा धर्म त्यांना अभिप्रेत नाही. तर संपुर्ण विश्वाचा विचार करणारा संपुर्ण मानवजातीच्या कल्याणाचा धर्म त्यांना अपेक्षित आहे. संत तुकडोजी महाराजांचे धर्माचे विवेचन करतांना डॉ. मा.गो. वैद्य यांनी म्हटले आहे की, संत तुकडोजींना व्यक्ती समष्टी, सृष्टी आणि चैतन्य परमात्मा यांना जो जोडुन ठेवतो तो धर्म अपेक्षित होता. तुकडोजी महाराज म्हणतात, धर्म बोलाया शब्द एक ! परि त्याचा विस्तार अलौकिक लौकिक आणि मिळोनिया पारमार्थिक अनक प्राणी जेथे राहती त्या सर्वाची रहावी सुस्थिती ! समान समाधानाची गति ! त्यास धर्म म्हणवे ! किंवा आत्मरुपाची धारणा सर्वाठायी समभावना विश्वकुटुंबे ऐशा आचरणा ! धर्म म्हणावे तिजलागी !

सर्व विश्वची व्हावे सुखी ! ही धर्माची दृष्टी नेटकी असे ते म्हणतात. तुकडोजी महाराजांची धर्माची कल्पना ही अतिशय मोलाची आहे. व्यक्तिधर्म, कुटुंबधर्म, ग्रामधर्म, आणि राष्ट्रधर्म अशा क्रमाने तो विकसित केलेला आहे. व्यक्तीधर्म सर्वा कळावा ! कुटुंब धर्म आचरणी यावा !

ग्रामधर्म अंगी बाणवावा ! राष्ट्र धर्माच्या धारणेने असे धर्माचे ते विवेचन करतात.

**प्रपंच आणि परमार्थ -** संत तुकडोजी महाराजांनी ज्या प्रमाणे परमार्थासंदर्भात विवेचन केले आहे त्याचप्रमाणे प्रपंचासंदर्भातही विवेचन केले आहे. त्यात त्यांनी प्रपंच सोडुन परमार्थ करा असे म्हटले नाही, तर प्रपंच कसा साधावा, व्यवहार कसा करावा, या संबंधी लिहिले आहे. केवळ प्रपंच किंवा केवळ परमार्थ असे चालणार नाही किंवा संन्यास संकल्पने संदर्भात ते म्हणतात झाला वासनेचा नाश ! त्यासचि नाम असे संन्यास ! आणि प्रवृत्ती, निवृत्ती संदर्भात म्हणतात प्रवत्ती सब निवृत्ती है ! वही सही निवृत्ती है !
घडी पल बने प्रवृत्ती ओ निवृत्ती वह अतृत्ती है ! विषयांध यदि इंद्रिय रहित होगा तभी अनासक्त है ! आसक्ती जब पुरी छुटें तब ग्यानी होता मुक्त है ! असे विषय वासनेच्या संदर्भात प्रतिपादन करतात.

प्रपंचासंदर्भात घ्ते संत जनानी जानले ! म्हणोनिच कळवळानी सांगितले, रांडापोरे सोडु नाक बोलिले ! परमार्थासाठी ! इतकेच काय घ्कोण म्हणे धन करु नये गाठी ! हिंडावे कपाटी हाटी सारे ! मागोनिया भीक पुरवील! संसार होईल कैसा याने ! शेत बागाईत कश्शने करावे ! धनाविण व्हाव फकिरची ! तुकडयादास म्हणे धनजोडकरा ! सत्याचा व्यापार करोनिया म्हणजेच महाराज आर्थिकदृष्टीने प्रपंचाचा विचार करतात. पुढे संसारासंदर्भात ही म्हणतात, त्करावे सुखाने संसार ! करावा अतिथीचा सत्कार बांधा सोपे माडया घर ! उत्तम व्यवहारे धन जोडा ! उत्तम व्यवहार करकुन पैसा जमा करुन घर माडाया बांधुन सुखाने संसार करा व अतिथीचरा हि सत्कार करा. असा विचार मांडला आहे. शिवाय ते म्हणतात, बायका मुलाची चिंता लागली ! म्हणोनिया वैराग्याची दिक्षा घेतली ! ते वैराग्य नव्हे कुचराई केली ! सोंग घेऊन वैराग्याचे ! लंगोटी लावली वासना गेली ! उपकिर्ती केली लोका माझे नेटका असा प्रपंच झाला ! तरि परमार्थ त्यातची साधला ! अशा प्रकारे उत्तम व्यवहाराने पैसे जमवा, शेती बागाईती करा, आंनदाने संसार करा. मुलाबाळांच्या चिंतेने घाबरु नका. खोटे किंवा कुचराई करुन जमु नका असा उपदेश करतात.

स्त्रीने पुरुषाच्या आधाराने रहावे, तिला स्वतंत्र अस्तित्व नाही, स्त्रीला स्वातंत्र नसावे, स्त्रीचे कार्यक्षेत्र मर्यादित असावे, स्त्रीच्या अंगी अवगुण असतात. ती पुरुषाच्या विकासासाठी अडथळा आहे, स्त्री ही पुरुषाच्या सुखासाठी परमेश्वराने निर्माण केली आहे. अशा पारंपारिक कल्पना त्यांना मान्य नव्हत्या, म्हणुनच त्यांनी महिलोन्नती प्रकरणच लिहुन तिच्याबद्दल विचार मांडले आहेत. त्यांनी महिलांचे

महत्व थोरवी गायिली असुन ती पुरुषापेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाही. तिला स्वतंत्र अस्तित्व असुन तिला तिचा विकास करु दिला पाहिजे. तिचे कर्तृत्वपुरुषाप्रमाणे किंबहुना पुरुषापेक्षाही श्रेष्ठ आहे. तिला समानता दिली पाहिजे तीच जगाचा उध्दार करणारी आहे. असे पुरोगामी विचार मांडले. आजच्या स्त्रीवादी विचाराचे प्रतिबिंब त्यात दिसते. का म्हणा अबला तिला ती शक्तीशाली नाही का? काय कमी देवे केले! तिला मानवाहुनि सांग ना असा प्रश्न विचारुन त्यांना निरीक्षणामध्ये काय दिसले ते मांडतात. निरीक्षोनि जी जी घरे पाहिली ! तेथे सरसता अनुभवा आली ! चातुर्य लक्षणे अधिक दिसली महिला माजी काय देवे देवता भिन्न केल्या काय स्त्रियांनी प्राण नाही अर्पिला ब्रीदासाठी ! म्हणुन स्त्रियेसारखी मुलायम नाही ! आणि कठोर रणचंडिका ! म्हणुन समाजी जो पुरुषासी आदर तैसाचि असावा व्यवहार किंबहुना अधिक त्यांचा विचार झाला पाहिजे समाज महाराजांनी स्त्रियांना पुरुषाप्रमाणेच समानता मिळायला हवी, असे सांगितले. ती अबला नाही तर ती शक्ती शाली आहे आहे पुरुषापेक्षा ही सरस आहे. स्त्रीलाच भक्ती, स्त्रीलाच ज्ञान तिलाच संयम, शहाणपण तिच्यानेच हलती वाटे संपुर्ण संसारचक्र ! जिच्या हाती पाळण्याची दोरी तिच जगाते उध्दारी ! किंवा स्त्रीच्या तेजावरीच पुरुषाचे मोठेपण ऐसे आहे. अशा या स्त्रीया, मुली आता शिक्षण घेत आहेत त्यांना विकासाची संधी मिळायला हवी.

काही मुली शिक्षण घेती ! मुलापेक्षा ही धीट असती नही गुंडाची छाती ! हात घालील त्यावरी ! मुलीनी शिकावे, संघटीत व्हावे असाही विचार मांडतात. जैसी मुलांची संघटीत सेना ! तैसी स्त्रियांची असावी संघटना! हा विचार आजही किती तरी दृष्टीने उचित, योग्य आहे. अशा प्रकारे स्त्रियांसंदर्भात पुरोगामी विचार मांडले आहेत.

तुकडोजी महाराजांनी आपली भुमिका स्पष्ट केली आहे. जो ज्यापाशी उत्तमगुण त्यानेच त्याचे चाळावे जीवन ! व्हावे समाजाचे ही धारण पोषण ! हीच योजना मी उच्च म्हणोनि ! वाढविले अवडंबर पुर्ण त्यानेच जाहले पतन समाजवादी सर्वांचि लागले ! म्हणुन ते म्हणतात माणसाची श्रेष्ठता- कनिष्ठता ही त्यांचा आचारधर्मावर व गुणकर्मावर साफ करोनी द्यावे पेटवुनि कैचन ते सर्वांनी जमावे आपले दुष्कृत्य निवेदावे असे सांगुन गावा गावशी जागवा भेद समुळ मिटवा उजळा ग्रामोन्नतीचा दिवा तुकडया म्हणे.

कुठल्याही धर्म, पंथाचे अवडंबर न माजविता ग्रामीण भौतिक जीवनाच्या विकासाचा राजमार्ग तयार केला. ग्रामीण जीवन दारिद्रय, हिंसा, विषमता, शोषण, राजकीय, बेदिलीनी ग्रस्त आहे त्यामुळे ग्रामजीवनात नैराश्याच्या व ओंगळवाण्या जीवनचक्रातुन बाहेर काढुन एक सुंदर रसरशीत अर्थपुर्ण भौतिक जीवन जगण्याचे व्यावहारीक प्रारुप मांडण्याचे काम संत तुकडोजी महाराजांनी केले त्यांच्या मते गाव हा विश्वाचा छोटा नकाशा आहे. गावावरुन देशाची परीक्षा करता येते. गावधर्म, समाजधर्म आणि राष्ट्रधर्म हे एकमेकांना तुरक आहेत. त्यामुळे गावातील दैन्य संपवावे. शिक्षणसंस्था, आश्रमसंस्था, सत्संगसंस्था काढाव्यात अंध, पंगु, महारोगी, अनाथ, वृध्द यांच्यासाठी जागोजागी आरम चालवावेत आणि ग्राम सेवा हिच ईश्वर सेवा आहे याचा अनुभव घ्यावा.

गावात उत्तम खेळ, कला, सौंदर्यवर्धन व्हावे, अशी अपेक्षा करतातप्रत्येक घरात जोडधंदा हवा गावात ., त्याचा पैसा गावातच रहावा, ग्राम म्हणजे गाव हे एक कुटुंब आहे असे लोकांच्या मनावर बिंबवावे रोखले पाहिजेत खेडेचि शहराचे जनक .गावातील लोक शहराकडे जातात . शहर भोक्ते, खेडे उत्पादक शहराकडे न जाता लोक धावावे उलट खेडयाकडे यासाठी जे जे गावी भिन्न उद्योग त्यांचा जुळवावा संयोग ठराविक जागी नाना प्रयोग चालवावे गावात असे सांगतात असे स्वच्छ, स्वयंपूर्ण, स्वावलंबी ग्रामाची त्यांची संकल्पना आहेजाधव म्हणतात .ग .रा .प्रा . संतांच्या कार्याने अधिष्ठान मूलतः परंपरागत, धार्मिक आध्यात्मिक स्वरूपचेच होते एक प्रकारे हा धर्म अध्यात्म .केंद्रित इहवाद होताकिंवा उन्नत . संत तुकडोजी संत व्युहात एक प्रकारचे इहवादी मिशन होते असे ही .नैतिक दृष्टीने केलेले धार्मिक आध्यात्मिक प्रणालीचे हे इहवादीकरण होते म्हणता येईल .

तुकडोजींचे देशप्रेम व राष्ट्रप्रेममहाराजांवर महात्मा गांधीतुकडोजी म -, विनोबा भावे, नेहरू यांचा प्रभाव होता, १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्य लढयात त्यांनी स्वतःला झोकून दिलेते म्हणतात .या काळात त्यांनी अतिशय क्रांतीकारक गीते लिहून तरुणांच्या मनात क्रांतीची ज्योत पेटविली . घेवूनी बसे । तरुन असोनी रक्त न उसळ अग्नि भटकला युध्दाचा अन तु आळस े नवजवान तुज म्हणा कसे संत महंतो जाग उठो किंवा अरे उठा श्रीमंतांनी अधिकाऱ्यांनो, पंडितांनो, संशितांनो, संशिक्षितांनो, सांधुजनांनो, हाक आली क्रांतीची येथील झाडे झुडपे शस्त्र बनतील भक्त बनेगी सेना, पत्थर सारे बॉम्ब बनेंगे, तरूणांना ही गर्जूधा वीरगर्जना, चमकू द्या रक्त वीरांचे उघडुरेण शरांचे, फोडू द्या भंड क्रूरांचे, असे आवहन करतातआणि . स्वातंत्र्य मिळविण्यात सहभागी होता चीनने आक्रमण केले तेव्हाही तैयार हुआ हिंद तुम्हारे साथ, आओ चिनिओं मैदान मे धरो हिंद का हाथा असे वीररसयुक्त काव्य ही त्यांनी लिहिले आणि अनेक .तरुणांनी त्यातून प्रेरणा घेऊन राष्ट्रसेवा केली .

संत तुकडोजी महाराजंची भाषा आपल्या मनातील भाव व्यक्त करण्यासाठ ते उत्सफूर्त स्वाभविकपणे लेखन करतातत्यामुळे त्यांच्या . भाषेत फटकळपणा, उदवेग, वैताग प्रकट होतोत्यामु .गे असणारी तळमळ जाणवत राहतेकारण त्यापाठीमा .ळे समाजातील सोंगलोंगावर, विसंगतीवर कोरडे ओढतात ती भाषा अतिशय तिखट व तीव्रबनते.

तुकडोजी महाराजांच साहित्यात वैदर्भी भाषेतील शब्द जसे आढळतात त्याचप्रमाणे हिंदी मिश्रीत व मराठी शब्द ही आढळतातत्याची . शैली संवादात्मक, नाटयात्मक, उत्स्फूर्त, अनुभवाची, आशयाची, महनता, गहणता व्यक्त करणारी आहे तिच्या परखडपणा आढळतोतसेच .

यमक, उपमा, दृष्टांत, रूपके, शब्दकोटया आढळतात प्रभावी निवेदन शैली, प्रत्ययकारी शब्दचित्र, समर्पक शब्द रचना, कल्पकता, सुभाषिते, उपहास विनोद या सर्वांचा आढळ त्याच्या आढळ त्याच्या शैलित होतो तसेच त्याच्या भाषेत जनभाषेतील शब्द ही आढळतात जसे मोकाट, दारूबाजी, जत्था, बिरडे, खंडोखंडी, चुथडा, धसलं, घुंगट, छदाम, पंजर, फुरसद इथोडक्यात राष्ट्रसंत तुकडोजी .अशा प्रकारची त्यांची भाषा आहे . महाराजांचा साहित्यात पत्त्वज्ञान, धर्मचिंतन, प्रपंच परमार्थ, स्त्रीपुरूष समा-नता, सर्वधर्म सहिष्णुता, राष्ट्रीय एकात्मता, वैश्विक आणि वैज्ञ ज्ञानिक दृष्टीकोण, संवेदनशीलता इमाझी गादी नाही आणि माझा मठ ही .संत तुकडोजी महाराज म्हणतात माझा वारस कोणी नाही .वैशिष्टये जाणवतात . माझे जे काही आहे .नाही, ते सगळे जनतेने मला दिलेले आहे आणि ती .माझी वारस आणि उत्तराधिकारी आहेमी ह सगळे तिच्या स्वाधीन करून . .व्या वर्षी अनंतात विलीन झाला ५९ रोजी म्हणजे वयाच्या १९६८ नाव्हेंबर १० जाणार असे म्हणत म्हणत हा थोर महात्मा

**निष्कर्ष :-**

१. देशबांधवांचे जीवन उन्नत व्हावे यासाठी त्यांनी आयुष्यभर आपली लेखणी व वाणी झिजवली.
२. नवभारताच्या निर्मितीत ग्रामसुधारणेचे महत्व सांगितले.
३. त्यांच्या विचारांचे स्थान ग्रंथात नाही तर प्रत्यक्ष जीवनात आहे.
४. समाजप्रबोधन विज्ञाननिष्ठ होते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. अक्षयकुमार काळे :- 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ती आणि वाङःमय' विद्या बुक्स सुविचार प्रकाशन नागपुर- २००८
२. नीता सत्यनारायण (संपा) :- 'लोकराज्य' शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय मुंबई नोव्हेंबर २०००
३. अटलबहादुर सिंह (संपा) :- मराठी ग्रामसेवक 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विशेषांक' वर्ष २००३ अंक ३
४. बाळ पदवाड :- 'राष्ट्रसंत आणि काही विचारवंत'

LBP PUBLICATION